# राष्ट्रीय आरोग्य अभियान, अलिबाग-रायगड.
## पदभरती जाहिरात दि. १०/०७/२०२४

बेटी बचाओ
save the girl child

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रमांतर्गत मंजूर असलेली पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने भरणेकरीता दि.२९/०६/२०२५ रोजीपर्यंतच्या कालावधी करीता खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. त्यानुसार रिक्त पदांचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | नियुक्ती स्तर | मानधन प्रति महिना | एकुण पदे | जात निहाय पदांची संख्या (आरक्षण) | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Dialysis Technician IPHS-1 | 10+2 with Science And Diploma or Certificate course in Dialysis Technology | जिल्हा रुग्णालय अलिबाग-१ | 17000/- | ०१ | भजब - १ | कमीत कमी १ वर्ष डायलेसिस विभागामध्ये टेक्निशियन म्हणुन काम केल्याचा अनुभव. |

❖ *अटी व शर्ती -*

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन सदर पदांची नियुक्ती दि. २९/०६/२०२५ पर्यंत राहील.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु राहणार नाहीत, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा वर नमूद तक्त्यानुसार एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

६) जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो व रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. तसेच जात निहाय पदांची संख्या (आरक्षण) यामध्येही बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रा.जि.प रायगड - अलिबाग यांनी राखून ठेवले आहेत.

७) निवड झालेनंतर संबधित पदावर हजर होताना उमेदवाराने वर्तणूकीचा दाखला सादर करणे बंधनकारक असेल.

८) वर नमूद अ.क्र.१ पदांच्या शैक्षणिक अर्हता व अनुभव यामध्ये राज्यस्तरीय मार्गदर्शक सुचना तसेच निवड समितीचे आयत्या वेळी घेतलेल्या निर्णयानुसार बदल होवू शकतो याची सर्व इच्छुक उमेदवारांनी नोंद घ्यावी.

९) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी तसेच निवड यादी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा रुग्णालय, अलिबाग यांचे नोटीस बोर्डवर, रायगड जिल्हा परिषद यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

१०) उपरोक्त पदांकरीता उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे गुणवत्ता यादी रायगड जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना कौशल्य चाचणीकरिता बोलविण्यात येईल व त्यानंतर नियुक्ती आदेश देण्यात येतील.

११) निवड यादीतील गुणक्रमाकांचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबाव तंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

१२) डायलेसिस तंत्रज्ञ हे तांत्रिक पद असल्याने संबंधित पदाकरीता कौन्सिल नोंदणी अनिवार्य असल्याने डायलेसिस तंत्रज्ञ या पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांने सदर कौन्सिल प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१३) सदर जाहिरातीमध्ये नमुद डायलेसिस तंत्रज्ञ हे पद फक्त भ.ज.ब. या प्रवर्गातील उमेदवाराकरीता राखीव असल्याने या पदाकरीता भ.ज.ब. या आरक्षणाशिवाय इतर कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१४) मार्गदर्शक सुचनांनुसार जाहिरातीत नमुद केलेल्या विशिष्ट मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर गुणानुक्रमे सर्वात वर असणाऱ्या इतर कोणत्याही मागास प्रवर्गाच्या उमेदवाराची निवड करणेत येईल एकही मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध नसलेस खुल्या प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करणेत येईल.

१५) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद् करणे/ पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१६) वयोमर्यादा :- १८ वर्षे वय पूर्ण करीत असलेले उमेदवार अर्ज करु शकतात. अभियान अंतर्गत सेवाप्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुला प्रवर्ग ३८ वर्ष, राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहील. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या सेवेतील कार्यरत उमेदवारांकरिता कमाल सेवा प्रवेश ५ वर्षापर्यंत शिथिल राहील.

१७) सदरहु भरती प्रक्रियेकरिता इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्य प्रतीसह आपले अर्ज दि. 10/07/2024 ते दि. 19/07/2024 कार्यालयीन दिवशी या कालावधीमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.३० या वेळेमध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय दुसरा मजला जि.रु.अलिबाग पिन कोड ४०२२०१ येथे प्रत्यक्ष अथवा पोस्टाने सादर करावेत. दि. 19/07/2024 सायंकाळी ०५.३० नंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही तसेच ई-मेल द्वारे प्राप्त झालेल्या प्राप्त अर्जांचा देखील विचार केला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१८) उमेदवारांनी जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या अर्जाच्या विहीत नमुन्यामध्येच अर्ज सादर करावेत. खाली नमुद आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे -

- विहीत नमुन्यातील अर्ज (अर्जाचा नमुना जाहिरातीसोबत जोडला आहे)
- संबंधित पदाशी निगडित शैक्षणिक अर्हतेबाबतची सर्व प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (१० वी, १२ वी व पदवी, पदव्युत्तर पदवीच्या सर्व सत्रांच्या गुणपत्रिका)
- शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला
- NHM, शासकिय संस्था, विभाग, शासन अंगिकृत संस्थेतील व खाजगी संस्थेतील अर्ज करित असलेल्या संबंधित पदाचा अनुभव दाखला
- जातीचे प्रमाणपत्र
- संबंधित पदाकरिता परावैद्यक (Paramedical Council) कौन्सिलचे महाराष्ट्र राज्याचे नोंदणी प्रमाणपत्र (पर्मनंट), नोंदणीचे नुतनीकरण व कौन्सिलचे आयकार्ड
- पासपोर्ट आकाराचे २ फोटो
- उमेदवाराच्या नावांत बदल झाला असल्यास शासनाचे राजपत्र

- आधारकार्ड
- पॅनकार्ड
- लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र

१९) उमेदवाराच्या नावात बदल झाला असलेस त्याबाबतचे शासनाचे राजपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

२०) याशिवाय कौशल्य चाचणी व मूळ कागदपत्र तपासणी वेळेस उमेदवारांनी अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व शैक्षणिक व इतर कागदपत्रांच्या मुळप्रती सादर करणे बंधनकारक राहील. मुळ प्रती सादर न केल्यास सदर उमेदवारास नियुक्ती आदेश देण्यात येणार नाहीत.

२१) **उमेदवारांच्या पुर्वीच्या कार्यकाळात कुठल्याही स्वरुपाचे प्रशासकिय व वित्तीय कार्यवाही, दंडात्मक कार्यवाही किंवा फौजदारी अथवा इतर कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी.**

२२) **कामावर रुजू होताना उमेदवाराने सादर केलेल्या माहितीची पडताळणी होणार असल्याने, त्यात काही अनियमितता आढळल्यास नियुक्ती आदेश रद्द करणेत येतील.**

२३) राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्गदर्शक सुचनांनुसार दि.२३/०७/२०२० पासून दोन पेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार सदर पदभरती करीता अर्ज करणेस पात्र ठरणार नाहीत. परंतू एखाद्या उमेदवारास प्रथम प्रसूतीत एकच मुल असेल व नंतरच्या एकाच प्रसूतीत जन्मलेल्या कोणत्याही एकापेक्षा अधिक मुलांना एकच अपत्य म्हणून समजण्यात येईल.

२४) राष्ट्रीय आरोग्य अभियान मार्गदर्शक सुचनांनुसार अर्ज करणाऱ्या उमेदवाराने यापूर्वी राष्ट्रीय आरोग्य अभियान मध्ये काम केले असल्यास व त्याची अकार्यक्षमता/अनियमिततेच्या कारणामुळे सेवा समाप्त करणेत आली असल्यास, सदर पदभरती करीता अशा उमेदवाराचा विचार केला जाणार नाही.

२५) निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकीय निकड लक्षात घेऊन पदस्थापनेचे ठिकाण अंतिम करण्याचा अधिकार निवड समिती राखुन ठेवत आहे.

दिनांक :-

ठिकाण :- अलिबाग

**सदस्य**
**निवड समिती**
**तथा,**
**जिल्हा शल्य चिकित्सक ,**
**जिल्हा रुग्णालय, अलिबाग**

**सदस्य सचिव**
**निवड समिती**
**तथा,**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**

**अध्यक्ष,**
**निवड समिती**
**तथा,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**रायगड जिल्हा परिषद, अलिबाग**